फोन. न. (2462) 229242,, 229243
फॅक्स नं. (2462) 229574

Phone : (02462) 229242, 229243
Fax (02462) 229574

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
''ज्ञानतीर्थ'' विष्णुपूरी.
**नांदेड - ४३१ ६०६.**

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY,
"Dnyanteerth" Vishnupuri
NANDED – 431 606 (MH.)

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, संचालक शारीरिक शिक्षण इत्यादी पदभरती करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर सेवाशर्ती विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम ३० जून, २०१० मध्ये स्पष्ट केलेल्या आहेत. त्या सदर अटी व शर्ती दिनांक १८ सप्टेबर २०१० रोजी भारताच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार ते पुर्वलक्षी प्रभावने लागु केलेले आहेत.

महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, संचालक शारीरिक शिक्षण व क्रीडा इत्यादी रिक्त पदांच्या मुलाखती विद्यापीठ निवड समिती मार्फत निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यावर विद्यापीठ परिनियम 167(f)(vi) नुसार निवड समितीचा अहवाल ४८ तासाच्या आत विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम निवड समितीच्या अहवालास (प्रक्रियेस) विद्यापीठाची मान्यता घेण्याचा प्रस्ताव विद्यापीठात सादर करावा. विद्यापीठाकडून निवड प्रक्रियेस मान्यता मिळाल्यानंतरच संबंधितास नियुक्ती आदेश देवून रूजू करुन घेण्याची प्रक्रिया करावी. संबंधितास रूजू करून घेतल्यानंतर त्यांचा नियुक्तीस मान्यतेचा प्रस्ताव विद्यापीठात एक महिन्याच्या आत मान्यतेसाठी सादर करावा. परंतु असे होत नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे.

त्यामुळे दिनांक २५-०७-२०१२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आलेला आहे.

> "संबंधित महाविद्यालयाने ४८ तासात निवड समिती अहवाल सादर करणे बंधनकारक आहे, तथापि अपवादात्मक परिस्थितीत महाविद्यालयाने अपरिहार्य परिस्थिती संदर्भात दिलेले स्पष्टीकरण योग्य असल्यास किमान रू.५,०००/- (रूपये पाच हजार फक्त) दंड आकारून सात दिवसांपर्यत असे प्रस्ताव स्विकारावेत, त्यानंतर सादर होणारे प्रस्ताव स्विकारण्यात येवू नयेत असे सर्वानुमते ठरले."

तरी ही बाब सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून याची नोंद घ्यावी.

''ज्ञानतीर्थ'' )(
विष्णुपूरी, नांदेड )(
शैक्षणिक/०२/२०१२-२०१३/४९७, )(
दिनांक ०२/०८/२०१२ )(

स्वाक्षरित/-
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ